नि. फौ. खटला क्र.२६७/२०२२ निशाणी क्रमांक ६

**उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. धीरज लामसंगे यांच्यामार्फत पुढे सुरु**

५] आम्ही मागील चार ते पाच वर्षांपासून आरोपींच्या आजूबाजूला राहण्यास आहोत. आरोपी गौरव बावणे याच्या घरापासून माझ्या घराचे अंतर २ किलोमीटर इतके आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी मी डीजेवर दारू पिऊन धूमधाम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी मी डीजेवर नाचत असताना आजूबाजूच्या लोकांना धक्काबुक्की करत होतो. हे म्हणणे खरे नाही की मला गांजाचे देखील व्यसन आहे.

६] हे म्हणणे खरे आहे की माझ्यावर अनेक फौजदारी खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. हे म्हणणे खरे नाही की मला फौजदारी खटल्यात शिक्षा झालेली आहे आणि मी जेलमध्ये जाऊन आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की मी घटनेच्या वेळी धामधूम करत असल्यामुळे सर्व लोक मला समजावत होते. हे म्हणणे खरे नाही की मी नशेत असल्यामुळे कोणाचे ऐकत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे माझी पत्नी तिथे आली व मला ओढत घरी घेऊन गेली. हे म्हणणे खरे नाही की मी घरी गेल्यानंतर माझ्या पत्नीला मारहाण केली आणि त्या धक्काबुक्कीत मला मार लागला होता.

७] हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझ्या पत्नीसोबत माझ्या घरचे देखील आले होते व ते मला ओढत-ढकलत घरी घेऊन गेले होते आणि त्यामुळे मला जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी आरोपीने माझ्या पत्नीचा हात पकडला, हे मी खोटे सांगत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, नरेश बावणे याने माझ्या पत्नीचा हात पकडला आणि तिची कुर्ती फाडली होती. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितल्याप्रमाणे कोणती घटना घडली नाही किंवा मला कोणी मारहाण केली नव्हती.

८] माझ्या घरापासून पोलीस स्टेशनचे अंतर अंदाजे चार किलोमीटर इतके आहे आणि तिथे जाण्यासाठी पाच ते १० मिनिटांचा वेळ लागतो. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी मी दारू प्यायलो असल्यामुळे त्या दिवशी तक्रार दिली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी घटनेनंतर त्वरित पोलीस स्टेशनला गेलो होतो, पोलिसांनी त्यानंतर मला दवाखान्यात घेऊन गेले आणि त्यानंतर मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

९] हे म्हणणे खरे नाही की मी विचारपूर्वक माझ्या पत्नीसोबत संगनमत करून आरोपींविरुद्ध खोटा गुन्हा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की लोकांना माझ्यामुळे त्रास होत होता, त्यामुळे आरोपींनी मला

समजावण्याचा प्रयत्न केला आणि म्हणून मी त्यांच्याविरुद्ध खोटी फिर्याद केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी मला चाकूने मारले अशी काही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझी आणि आरोपींचे घटनेच्या पूर्वीपासून संबंध चांगले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की आर्टिकल एम-२ वरील बनियान पोलिसांनी माझ्याकडून कधी जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी कोर्टात खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा./-

**( व्ही. आय. शेख )**

दिनांक : १०/०२/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगणा